**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४७९/२०२५**
**निशाणी क्र. ९ लगत**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १**
**मी शपथेवर कथन करतो की,**

नाव– सोमिनाथ कचरु सोनवणे
वय– ३२ वर्ष,
धंदा– शेती
रा. औराळा, ता. कन्नड

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ चा सरतपास अर्जदाराचे वकील श्री. टी. डी. शिंदे यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

**०१.** मी माझ्या सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आहे. मी सदर शपथपत्रातील संपुर्ण मजकुर वाचून पाहिला आहे व त्यावर माझी सही केली आहे. मी खालीलप्रमाणे दस्तऐजव दाखल करीत आहे.

**०२.** माझी आजी पार्वताबाई धोंडीबा सोनवणे यांचे दिनांक २०.०६.२०२२ रोजीचे मृत्यूप्रमाणपत्र दाखविले त्यास निशाणी क्र. १० देण्यात येते. माझे वडील नामे कचरु धोंडीबा सोनवणे यांचे दिनांक २७.०४.२०२५ रोजीचे मृत्यूप्रमाणपत्र दाखविले त्यास निशाणी क्र. ११ देण्यात येते.

**०३.** आता मला अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या ओळखपत्राची प्रत दाखविण्यात आली. त्यास निशाणी क्र. १२ ते १४ ते देण्यात येत आहे. अर्जदार क्र. ४ च्या अनुषंगाने कौटुंबिक शिधापत्रिका दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. १५ देण्यात आले.

**०४.** आता मला दैनिक 'तरुणभारत' या वर्तमानपत्रातील दिनांक २६.११.२०२५ जाहिर प्रकटणाची प्रत दाखविण्यात आली. त्यास निशाणी क्र. १६ देण्यात येत आहे.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

NITIN DHOKE
Digitally signed by NITIN DHOKE
Date: 2026.07.07 14:51:41 +0530

**दिनांकः ०७.०७.२०२६**
**कन्नड**

**( एन. आर. ढोके )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**कन्नड**